


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २२४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२७ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## इराणकडून भारताला दिलासा, पाकिस्तानचीही होर्मुझ संकटातून सुटका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, तेहरान :** मध्य पूर्वेत गेल्या चार महिन्यांपासून युद्ध सुरु आहे. इराण विरुद्ध इस्रायल, अमेरिका संघर्षामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आल्या आहेत. इराणनं होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी खनिज तेलाची वाहतूक रोखल्यानं अनेक देशांसमोर ऊर्जा संकट निर्माण झालं आहे. पण इराणनं या संकटातून सहा देशांची सुटका केली आहे. यामध्ये भारताचा समावेश आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतून जगाच्या एकूण खनिज तेलाच्या वाहतुकीपैकी २० टक्के व्यापार चालतो. याच मार्गानं आखाती देशांचं खनिज तेल अनेक देशांपर्यंत जातं. इस्रायल, अमेरिकेनं इराणवर हल्ले सुरु करताच इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक रोखली आणि जगाच्या नाकीनऊ आणले. यानंतर आज इराणनं सहा देशांना संकटातून दिलासा दिला आहे. भारत, रशिया, चीन, इराक, पाकिस्तानच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडण्याची परवानगी इराणनं दिली आहे. या देशांची यादी आज सकाळीच इराणनं जाहीर केली. आता त्यात मलेशियाची भर पडली आहे. त्यामुळे इराणच्या मित्र देशांची संख्या सहावर पोहोचली आहे.

मलेशियाच्या जहाजांना होर्मुझ ओलांडण्याची परवानगी इराणकडून देण्यात आल्याची माहिती मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी दिली आहे. 'आम्ही इराण, इजिप्त, तुर्की आणि आखातातील अन्य देशांच्या नेत्यांशी संवाद साधला. यानंतर इराणनं मलेशियन जहाजांना होर्मुझमधून प्रवास करण्यास हिरवा कंदिल दाखवला. याबद्दल मी इराणच्या अध्यक्षांचा आभारी आहे,' असं अन्वर यांनी देशाला संबोधित करताना म्हटलं.



'आता आम्ही मलेशियन तेल टँकर्स आणि त्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुटकेची प्रक्रिया सुरु करत आहोत. कर्मचाऱ्यांचा परतीचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. मध्य पूर्वेत शांतता नांदावी यासाठी प्रयत्नशील आहोत. यासाठी इराण आणि अन्य देशांशी संवाद साधला आहे,' असं अन्वर म्हणाले.

'मध्य पूर्वेत शांतता प्रस्थापित करणं सोपं नाही. कारण आपल्या सोबत अनेकदा विश्वासघात झाल्याचं इराणला वाटतं. इराणला सुरक्षेबाबत कोणतीही शाश्वती दिली जात नाही. त्यामुळे त्यांच्याकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही,' असं निरीक्षण त्यांनी नोंदवलं.

## शिधापत्रिकेवर तीन लीटर केरोसीन, नागपूरला मिळणार १२० किलोलीटरचा साठा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, नागपूर :** मध्य पूर्व आशियात सुरु असलेल्या युद्धाचे पडसाद महाराष्ट्रातही बघायला मिळत आहेत. महाराष्ट्रात गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत आहे. केंद्र सरकारने आधी घरगुती गॅस सिलेंडरच्या वितरणाला प्राधान्य दिलं आहे. तर व्यवसायिक सिलेंडरवर काही काळ बंदी टाकण्यात आली होती. आता यामध्येही सरकारकडून हळूहळू शिथिलता देण्यात येत आहे. असं असलं तरी संभाव्य परिस्थितीचा धोका लक्षात घेऊन राज्य सरकारने आता केरोसीन वाटपाची तयारी पूर्ण केली आहे. युद्धाचा भडका शांत झाला नाही तर कदाचित एलपीजीच्या पुरवठ्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. यामुळे केंद्र सरकारकडून देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आता राज्यात शिधापत्रिकेवर प्रत्येकी ३ लीटर केरोसीन देण्यात येणार आहे.

एलपीजी गॅसच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने केरोसिनचे तात्पुरते वितरण सुरू केले आहे. नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी १२० किलोलीटर केरोसिन मंजूर करण्यात आले आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक शिधापत्रिकाधारक कुटुंबाला ३ लीटर केरोसिन देण्यात येणार आहे. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाच्या आदेशानुसार, केंद्र सरकारकडून राज्याला एकूण ३७४४ किलोलीटर केरोसिन (३७ लाख ४४ हजार लिटर) उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय वाटप करण्यात आले असून, नागपूर शहरासाठी केरोसिन वाटप शून्य ठेवण्यात आले आहे. अंत्योदय आणि प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार असून, उपलब्धतेनुसार इतर कुटुंबांनाही केरोसिन दिले जाणार आहे. केरोसिनचे वितरण मार्च २०२६ पासून सुरू होऊन ४५ दिवसांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. रास्त भाव दुकानदार आणि परवानाधारक विक्रेत्यांमार्फत हे वितरण करण्यात येणार आहे.

## पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकोप अखेर केंद्र सरकारच्या ताब्यात..

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, मुंबई :** पुणे-नाशिक आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांच्या दरम्यानचा थेट रेल्वे मार्ग विकसित करणे हे या सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट होते, जे आता अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहे.

आता तर हा हा बहुप्रतीक्षित सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प महारेलकडून काढून रेल्वे विभागाकडे देण्यात आला आहे. त्यामुळे राज्य शासनाने ६८४ कोटी महारेलकडून परत मागितले आहेत. मात्र त्यापैकी भूसंपादनावर खर्च केलेले ३१६ कोटी वाया जाण्याची शक्यता आहे. नाशिक पुणे सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प महारेल कॉर्पोरेशन या महाराष्ट्र सरकारच्या कंपनीकडून काढून घेत तो रेल्वेकडे सोपविला आहे.

रेल्वे मंडळाने महारेल कॉर्पोरेशनला प्रकल्पावर खर्च न करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य सरकारने या पूर्वी महारेलकडे जमा केलेल्या १ हजार कोटी रुपयांपैकी ६८४ कोटी रुपये परत मागितले आहेत. मात्र त्यातही ३१६ कोटी भूसंपादनावर खर्च झाले आहेत. त्यामुळे भूसंपादनावरील खर्च वाया गेले असून, त्यावर शासनाला पाणी सोडावे लागले आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत दिलेल्या उत्तरातून स्पष्ट झाले आहे.

या हायस्पीड रेल्वेमार्गाकरिता संपादित करावयाच्या जमिनीचे सर्वेक्षण करून दोन तीन वर्षे झाली, परंतु काम सुरू झालेले नाही. महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने सुमारे १६ हजार कोटी रुपये खर्चाचा पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्प पाच वर्षांपूर्वी जाहीर केला होता. मात्र, तो वेगवेगळ्या कारणांमुळे अजूनही कागदावरच आहे.

हा बहुचर्चित प्रकल्प महारेल कॉर्पोरेशन या महाराष्ट्र शासनाच्या कंपनीकडून उभारण्यात येणार होता. महारेलने त्यासाठी १६ हजार ३९ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार केला होता. त्यातील ६० टक्के म्हणजेच ९ हजार ६२३ कोटींचा निधी महारेलकडून कर्जाच्या माध्यमातून उभारला जाणार होता, तर ४० टक्के म्हणजेच ६ हजार ४१६ कोटी रुपयांचा निधी राज्य आणि केंद्र प्रत्येकी ५० टक्के हिस्सा देणार होते.

राज्य शासनाने ३ हजार २०८ कोटी रुपयांचे समभाग घेण्यास दि. १५ एप्रिल २०२१ रोजी मान्यता दिली होती. त्यानंतर या प्रकल्पासाठी राज्याच्या हिश्श्याचे १ हजार ६२ कोटी रुपये महारेलकडे वर्ग करण्यात आले होते. महारेलने नाशिक, नगर व पुणे जिल्ह्यांतील १०० हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करून संबंधित जमीनमालकांना ३१६ कोटी रुपये दिले आहेत.

दरम्यान, हा रेल्वेमार्ग व्यवहार्य नसल्याच्या कारणावरून रेल्वे मंत्रालयाने त्याला मान्यता दिली नाही. त्यातच नारायणगाव येथील नॅशनल



सेंटर फॉर रेडियो स्ट्रोफिजिक्स या संस्थेने या प्रकल्पाच्या आरेखनाला विरोध केला आहे. त्यामुळे रेल्वेबोर्डाने या प्रकल्पाला जून २०२० मध्ये दिलेली प्राथमिक तत्त्वतः मान्यता काढून घेतली. त्यानंतर नाशिक पुणे रेल्वेमार्ग नारायणगाव वगळून करण्याचा निर्णय होऊन, तो शिर्डी नगर मार्गे चाकण व तेथून पुणे असा प्रस्तावित करण्यात आला. मात्र, त्या नवीन रेल्वेमार्गामुळे संगमनेर, नारायणगाव वंचित राहणार असल्यामुळे त्या भागातून शिर्डीमार्गे रेल्वेला विरोध होत आहे.या पार्श्वभूमीवर रेल्वेने या नवीन प्रकल्पाचा १७ हजार ८८९ कोटी रुपये खर्चाचा सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) रेल्वे बोर्डाला सादर केला आहे. प्रकल्पासाठी राज्य सरकारने आतापर्यंत वितरित केलेल्या १ हजार ६२ कोटी निधीपैकी भूसंपादनासाठी खर्च झालेला ३१६ कोटी निधी वगळता उर्वरित ६८४.६२ कोटी रुपये परत करण्याची मागणी सरकारने महारेलकडे केल्याचीही माहितीही सरनाईक यांनी दिली. सुधारित सरेखन जीएमआरटी अँटेनाच्या सर्वात बाहेरील अँटेनापासून १२-१३ किमी अंतरावर आहे. त्यानुसार सुधारित डीपीआर रेल्वे बोर्डाच्या विचाराधीन आहे. हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग बदलण्याच्या रेल्वेच्या निर्णयाला विरोध होत असून, हा रेल्वेमार्ग जुन्या सव्र्व्हेनुसार सिन्नर संगमनेर-नारायणगाव मंचर राजगुरुनगर चाकण या मार्गाने करण्याची मागणी आहे. या प्रकल्पाकरिता नाशिक, अहिल्यानगर व पुणे या जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत ९९.१८ हेक्टर जमीन संपादित केली असून ३१६ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

## मुख्यमंत्री यांची मोठी घोषणा : धानाला बोनस देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक

### आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत महत्त्वपूर्ण घोषणा केली. धान पिकाला बोनस (प्रोत्साहनपर राशी) देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक निर्णय घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भातील निकष निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच अंतिम निर्णय जाहीर करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने लढा देणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यामुळे मोठे यश मिळाले आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आ. मुनगंटीवार यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित करून धान उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा विधानसभेच्या पटलावर पोट तिडकीने मांडली होती. धान उत्पादनासाठी वाढलेला खर्च, नैसर्गिक आपत्तींचे संकट आणि बाजारभावातील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांना तातडीने दिलासा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

आज अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यात प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ. मुनगंटीवार यांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत राज्य शासन धान पिकासाठी बोनस देण्याच्या निर्णयाबाबत सकारात्मक असल्याचे जाहीर केले. त्यामुळे राज्यातील लाखो धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या धान उत्पादक जिल्ह्यांतील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सातत्याने विधानसभेत मांडल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदने सादर करत शेतकऱ्यांच्या अडचणींची सविस्तर माहिती वेळोवेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने



आणि आक्रमकपणे केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाला या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी लागली. परिणामी धानाला बोनस देण्याबाबत सकारात्मक भूमिका जाहीर होणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक बाब ठरली आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्यांच्या संघर्षाला न्याय मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## पेट्रोल-डिझेलच्या काळाबाजारावर कडक कारवाईचा इशारा...

**दि.२६, नागपूर :** राज्यात पेट्रोल पंपांवर अचानक वाढलेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल 'लॉकडाऊन' लागू होणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरत आहेत. मात्र, या सर्व अफवांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठामपणे फेटाळून लावत राज्यात कुठल्याही प्रकारची इंधनटंचाई नसल्याचे स्पष्ट केले आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन पेट्रोल-डिझेलची पॅनिक बाईंग करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. केंद्र सरकारने सांगितले आहे की, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. दर महिन्याला जितके पेट्रोल डिझेल आवश्यक असते, तितका पुरवठा सरकारकडे नियमितपणे उपलब्ध असतो. केंद्र सरकारकडूनही वारंवार इंधनसाठा पुरेसा असल्याची माहिती देण्यात येत असतानाही काही ठिकाणी नागरिकांनी अनावश्यक गर्दी करून जास्तीचे पेट्रोल भरून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या 'पॅनिक बायिंग' मुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता वाढते, असे मुख्यमंत्र्यांनी केले.

अचानक वाढलेल्या मागणीमुळे पुरवठा व्यवस्थेवर ताण येतो आणि त्यामुळे काही ठिकाणी अडचणी निर्माण होतात. मात्र, प्रत्यक्षात पेट्रोल-डिझेलची कमतरता नसताना लोकांनी पेट्रोल पंपांवर रांगा लावणे ही चुकीची प्रवृत्ती आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगावा आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेट्रोल-डिझेलचा काळाबाजारा बाबतही इशारा दिला. जर कुठे पेट्रोल किंवा डिझेलचा काळाबाजार होत असल्याचे आढळले, तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासन अशा प्रकारांवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**खताच्या खपात ७० टक्क्यांनी वाढ**

दरम्यान, खतांच्या साठ्याबाबतही त्यांनी महत्त्वाची माहिती दिली. राज्यात डीएपी खताच्या खपात तब्बल ७० टक्क्यांनी वाढ झाल्याचे नोंदवण्यात आले आहे. ही वाढही पॅनिक बायिंगमुळेच झाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, दरवर्षीप्रमाणे यंदाही आवश्यक तेवढा खतसाठा उपलब्ध होणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. खतांचा साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पुरवठादारांवरही कडक कारवाईचा इशारा मुख्यमंत्री यांनी दिला दिला. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, याची सरकार दक्षता घेत असल्याचे त्यांनी सांगितले.




## पेचात सापडलेले ट्रम्प

मस्त जगाला अभूतपूर्व तेलसंकटाच्या खाईत लोटून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या घडीला दिशाहीन होत चाललेल्या अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धातून सन्माननीय 'यशस्वी माघार' कशी घ्यावी, या पेचात सापडलेले दिसतात. देशाचे सर्वोच्च धर्मगुरू, नेते आयातुल्ला अली खामेनी यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांचे शिरकाण झालेले असताना काही दिवसांतच इराण शरण येईल, असा कयास बांधलेल्या ट्रम्प यांना अस्तित्वासाठी जिवावर उदार होऊन प्रतिहल्ले करणाऱ्या इराणने चकित केले आहे.

ट्रम्प यांना धडा शिकवण्यासाठी इराणने कुवेत, अमिराती, सौदी अरेबिया, कतार, बहारीन इत्यादी अमेरिकेच्या मित्रदेशांच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पांवर क्षेपणास्त्रे डागली. या तेलशुद्धीप्रकल्पाना ट्रम्प इराणच्या क्षेपणास्त्रांच्या तडाख्यातून वाचवू शकले नसल्याने आपण यापुढे अमेरिकेवर किती अवलंबून राहायचे याचाही विचार करण्याची पाळी या देशांवर आली आहे. जोडीला कतार, सौदी अरेबिया इत्यादी अनेक आखाती देशांत ट्रम्प यांचे व त्यांचे सध्या राजनैतिक मध्यस्थाची टोपी घालून फिरणारे जावईबापू जरेद कुश्नर यांचेही वैयक्तिक, व्यावसायिक, आर्थिक हितसंबंध गुंतले असल्याने ट्रम्प यांचा संताप होणे साहजिक आहे.

दुसरे म्हणजे, आखाती देशांसोबतच युरोपीय 'नाटो' राष्ट्रांबाबतही (ज्यामध्ये ब्रिटन, जर्मनी व फ्रान्स आदी अमेरिकेचे दुसऱ्या महायुद्धापासूनचे पारंपरिक 'दोस्त' राष्ट्रे येतात) ट्रम्प यांचा भ्रमनिरास झाला आहे. ट्रम्प यांनी आपल्या दोन्ही कार्यकाळात 'नाटो' मित्रराष्ट्रांना कस्पटासमान लेखून युरोपच्या सुरक्षेसाठी अमेरिकेवर अवलंबून राहण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीचे वाभाडे काढले. त्यांच्या मागणीनुसार ३२ राष्ट्रांच्या या गटातील अनेक राष्ट्रांनी आपली स्वतःची संरक्षणविषयक आर्थिक तरतूद वाढविली. तरीही ट्रम्प, उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स व संरक्षणमंत्री पेट हेग्सेथ यांनी युरोपीय मित्रांवरील विषारी टीका सुरूच ठेवली. 'रशिया-युक्रेन युद्ध ही युरोपची समस्या आहे.अमेरिकेने त्यात झीज का सोसावी?' असा पवित्रा घेऊन ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याबाबत मवाळ धोरण स्वीकारले. 'नाटो' देश यामुळे अर्थातच दुखावले गेले होते. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या घटनेनुसार युद्धाची सुरुवात करण्याआधी काँग्रेसकडून संमती घेतली नव्हतीच; तसेच 'नाटो'मधील मित्रराष्ट्रांनाही विश्वासात घेतले नव्हते.

होर्मुझ सामुद्रधनीची नाकेबंदी करून इराणने तेलसंकट निर्माण केले तेव्हा मात्र या आंतरराष्ट्रीय जलमार्गाने जाणाऱ्या तेलवाहू जहाजांचे इराणच्या क्षेपणास्त्रांपासून रक्षण करण्यासाठी ट्रम्प यांना मित्रराष्ट्रांची आठवण झाली. या राष्ट्रांनी अमेरिकेच्या जोडीला आपल्या युद्धनौका पाठवाव्यात, असे आवाहन ट्रम्प यांनी केले. ब्रिटन, फ्रान्स , जर्मनी व कॅनडा या प्रमुख दोस्तराष्ट्रांनी ट्रम्प यांची विनंती धुडकावली. जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांनी ट्रम्प यांना 'रशिया-युक्रेन युद्ध ही युरोपची समस्या आहे,' या त्यांच्या उद्गारांची आठवण करून दिली व, 'अमेरिका-इस्रायल व इराण यांच्यातील हे युद्ध ही युरोपची समस्या नाही' असा टोला लगावला. ट्रम्प यांनी ब्रिटनचे पंतप्रधान स्टार्मर यांना मदतीसाठी फोन केला असता, 'याबाबतचा निर्णय मला माझ्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशी बोलून घ्यावा लागेल,' असे स्टार्मर यांनी सांगितले. स्टार्मर यांनी चतुराईने आपल्या विनंतीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या, हे न समजण्याइतके ट्रम्प दुधखुळे नाहीत.

ट्रम्प हे अमेरिकेच्या शक्तिशाली लष्कराच्या कारवाईने स्वबळावर होर्मुझचा तिढा सोडवू शकतात; परंतु 'नाटो'च्या मित्रराष्ट्रांबरोबरचे अमेरिकेचे पारंपरिक सौहार्दाचे संबंध किती ताणले गेले आहेत, हे त्यांच्या ट्रम्प यांच्याशी वागतानाच्या 'जशास तसे' धोरणातून दिसते. ट्रम्प यांनी गेल्या वर्षी इफसान येथील इराणच्या अणुप्रकल्पावर महाशक्तिशाली बॉम्ब टाकून त्याचा विध्वंस केला आणि 'आता इराणची अणुबॉम्ब बनविण्याची क्षमता आम्ही पूर्णपणे नष्ट केली,' असे छाती फुगवून जाहीर केले होते. असे असताना, सध्याचे युद्ध पुकारताना 'अमेरिकेला व जगाला धोका निर्माण करणारा इराणचा अणुकार्यक्रम कायमस्वरूपी जमीनदोस्त करणे हे आपले एक उद्दिष्ट आहे', असे त्यांनी सांगितले. त्यांच्या आधीचे विधान व आत्ताचे विधान यांतील ठसठशीत विसंगती नजरेआड करता येत नाही. एकदा नष्ट केलेले इराणचे अणुप्रकल्प ट्रम्प पुन्हा जमीनदोस्त करणार म्हणजे नेमके काय, अशी चर्चा अमेरिकेतील ट्रम्प यांचे टीकाकार करीत आहेत.

**– हरीश जोशी**

# प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून मुंबई दिल्लीसह देशातील सर्वच महानगरे आणि मोठी शहरे प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली.

या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत.

प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे.

मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा, पुणे.**

# सम्राट अशोक : तलवारीतून धम्माकडे-मानवतेच्या इतिहासातील अद्वितीय प्रवास

भारतीय इतिहासात अनेक राजे झाले. काहींनी साम्राज्ये उभी केली, काहींनी युद्धे जिंकली, तर काहींनी संपत्ती आणि वैभवाची शिखरे गाठली. परंतु इतिहासात असे फार थोडे राजे आहेत ज्यांनी युद्ध जिंकूनही युद्धाचा त्याग केला आणि सत्ता असूनही मानवतेचा मार्ग स्वीकारला. अशाच अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे अशोका, ज्यांना इतिहासात सम्राट अशोक महान म्हणून ओळखले जाते. सम्राट अशोक हे केवळ एक सामर्थ्यशाली राजा नव्हते, तर ते मानवतेचा संदेश देणारे, दयाभाव आणि करुणेचा मार्ग दाखवणारे एक अद्वितीय शासक होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या विचारांचा आणि त्यांच्या धम्म नीतीचा विचार करताना भारतीय समाजाला आजही नवी दिशा मिळू शकते.

अशोक हे बिंदुसार यांचे पुत्र आणि महान सम्राट चन्द्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. मौर्य साम्राज्य आधीच विशाल होते, परंतु अशोक यांच्या काळात




त्याने प्रचंड विस्तार केला. त्यांच्या सामर्थ्यवान लष्कराने भारतातील मोठा भूभाग जिंकला. त्यांच्या राजवटीच्या सुरुवातीला ते एक कठोर, निर्णायक आणि पराक्रमी योद्धा म्हणून ओळखले जात होते. सत्ता मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक युद्धे लढली. परंतु त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टप्पा ठरला तो कालिंग युद्ध कलिंग, इतिहास बदलणारा क्षण. कलिंग (आजचे ओडिशा) जिंकण्यासाठी झालेल्या युद्धाने इतिहासाची दिशा बदलली. या युद्धात लाखो लोक मारले गेले, हजारो जखमी झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. रणांगणावर पडलेली प्रेते, विधवा झालेल्या स्त्रिया, अनाथ झालेली मुले या सगळ्या दृश्यांनी सम्राट अशोक यांचे मन हादरून गेले. इतिहासात सांगितले जाते की या युद्धानंतर त्यांनी रणांगणावर उभे राहून एक प्रश्न स्वतःला विचारला, या विजयाची किंमत इतकी भयानक का असावी? याच क्षणापासून त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला. कलिंग युद्धानंतर अशोक यांनी हिंसेचा मार्ग सोडला आणि बुद्धिस्म स्वीकारले. त्यांनी धम्म हा जीवनाचा आणि राज्यकारभाराचा आधार बनवला. धम्म म्हणजे केवळ धार्मिक विचार नव्हता. तर तो होता दया, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, सर्व धर्मांचा आदर. सम्राट अशोक यांनी युद्ध जिंकणाऱ्या राजापासून मानवतेचा संदेश देणाऱ्या राजामध्ये केलेले रूपांतर हे जगाच्या इतिहासात अद्वितीय मानले जाते. अशोक यांनी आपल्या राज्यात धम्मनीती राबवली. त्यांनी प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे, प्रवाशांसाठी धर्मशाळा उभारणे, विहिरी बांधणे, रुग्णालये उभारणे या सगळ्या गोष्टी त्या काळात अत्यंत प्रगत विचारांचे उदाहरण होते. त्यांनी प्राण्यांच्या हत्येवर मर्यादा आणल्या आणि पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता दाखवली. त्यांच्या शिलालेखांमध्ये प्रजेबद्दलची काळजी आणि नैतिकतेचा संदेश स्पष्टपणे दिसतो.

सम्राट अशोक यांनी बुद्धिसम चा संदेश केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही. तर त्यांनी धम्मदूत विविध देशांत पाठवले. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, नेपाळ, अफगाणिस्तान अशा अनेक देशांमध्ये बौद्ध विचारांचा प्रसार झाला. इतिहासात सांगितले जाते की त्यांचा पुत्र महिंदा आणि कन्या संघमित्ता यांनी श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार केला. यामुळे भारताची सांस्कृतिक ओळख जगभर पोहोचली. अशोक यांनी आपल्या प्रशासनात नैतिकतेला विशेष महत्त्व दिले. त्यांनी धम्ममहामात्र नावाचे अधिकारी नेमले जे लोकांच्या कल्याणाची काळजी घेत होते. राज्यकारभाराचा उद्देश केवळ सत्ता टिकवणे नसून प्रजेचे सुख आणि कल्याण आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्षात आणला. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारणात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक तणाव, हिंसा, असहिष्णुता आणि द्वेषाची भावना अनेक ठिकाणी दिसून येते. अशा वेळी सम्राट अशोक यांची धम्मनीती आपल्याला आठवण करून देते की, सत्ता मोठी असते, पण मानवता त्याहून मोठी असते. त्यांच्या जीवनातून आपल्याला एक महत्त्वाचा संदेश मिळतो. खरा विजय तलवारीने नाही, तर करुणेने मिळतो. आज भारताच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्येही अशोक यांची छाप दिसते. भारतीय राष्ट्रचिन्हातील लॉयन कैपिटल ऑफ अशोका हे त्यांच्याच काळातील सारनाथ स्तंभाचे शिल्प आहे. तसेच भारतीय ध्वजावरील अशोक चक्र हे त्यांच्या धम्मचक्राचे प्रतीक आहे. याचा अर्थ असा की आधुनिक भारताच्या मूल्यांमध्येही सम्राट अशोक यांच्या विचारांची छाया आहे. आज जगभरात युद्धे, संघर्ष आणि राजकीय तणाव वाढताना दिसत आहेत. अशा काळात सम्राट अशोक यांचा इतिहास आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. हिंसेने सत्ता मिळू शकते, पण मन जिंकता येत नाही. मानवतेचा मार्ग स्वीकारणारा राजा खऱ्या अर्थाने महान ठरतो.

सम्राट अशोका यांचे जीवन म्हणजे शक्तीपासून शांतीकडे, युद्धापासून करुणेकडे आणि अहंकारापासून मानवतेकडे जाणाऱ्या प्रवासाची प्रेरणादायी कथा आहे. त्यांनी दाखवलेला धम्माचा मार्ग आजही मानवतेसाठी प्रकाशाचा दीप आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांच्या साम्राज्याचे स्मरण करू नये, तर त्यांच्या विचारांचे स्मरण करावे. कारण खऱ्या अर्थाने महान राजा तोच असतो, जो तलवारीने नव्हे, तर मानवतेने जग जिंकतो. सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान विचारांना विनम्र अभिवादन!

**– प्रवीण बागडे**
**नागपूर, ९९२३६२०९१९**

## कोरस

वाचा फुटता मौनास
सुरु हो सर्वत्र कोरस
नसली लफडी शोधा
प्रत्येकां लागते चुरस

वाट्टेल ते खपवू टाक
अफवाफैले अनौरस
भागीदारी पाप कर्मा
कुणीचं नसतो वारस

मसाला बातम्या प्रिय
काहीचं नावडे निरस
लफडी करावी उघडी
कधी न करा रे विरस

करप्ट व्हावी सिस्टीम
घुसवा अघोर वायरस
विध्वंस पहाय आवडे
टपाटपा गळे सुधारस

घायाळ करी फुलांना
काट्या डवरला तरस
रक्त वाहू दे भळाळा
कुणा ना येणार तरस

बातमीची नशा गडद
फिके दारूअफूचरस
रोजहवे नवीन काही
विस्तारून बसे परस

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# पर्यावरणासाठी वन्य जिवांच्या चारा-पाण्याची सोय करणे गरजेचे

आजच्या डिजीटल युगात सिमेंटची जंगले फोफावत आहेत. परिणामी पशु-पक्ष्यांचा निवारा संकटात आला आहे. वन्य जीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे, पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या सिमेंटच्या जंगलांनी निर्सगावर आक्रमण केल्याने गावशिवारे आणि झाडेही कमी होऊ लागली आहेत.

वाढत चाललेले उन्हाचे चटके, निष्पर्ण होत असलेली झाडे, झुडुपे, दुर्मीळ होत असलेले पाणीसाठे यामुळे मुक्या वन्य प्राण्याना जगविण्यासाठी कसरत करावी लागत आहे. पक्ष्यांसाठी घराबाहेर पाणी ठेवा' असे संदेश सोशल मीडियावर फिरू लागतात. पण संदेश पाठविणाराच पक्ष्यांसाठी पाणी ठेवत नाही, ही शोकांतिका आहे. यामुळे पशु-पक्षी कमी होऊ लागले आहेत. प्रत्येकाने जबाबदारी ओळखून चारा पाण्याची सोय करणे गरजेचे आहे जागतिक उष्णतामानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतू बदल, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष,अतिवृष्टी, पुर इत्यादी नैसर्गीक आपत्तीवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे.

वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे लोकचळवळीत रुपांतर होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक, व्यक्ती, कुंटूब यांचा सहभाग अतिशय महत्वपूर्ण, आहे यंदा उन्हाच्या झळा भाजून काढत आहेत. उन्हापासून दक्षतेचे सर्व उपाय करुनही एखादी फेरी मारल्यानंतर धडधाकट माणसाला कधी एकदा घराच्या गारव्यात जातो अशी तीव्र इच्छा होते. पोळून काढणाऱ्या कडाक्याच्या उन्हात पोटाची खळगी भरण्यासाठी व पाण्याची तहान भागवण्यासाठी पक्ष्यांची मात्र अविरत धडपड सुरु असते. या धडपडीला सुसह्य करुन त्यांच्या जिवाला थोडासा गारवा देण्यासाठी गरज आहे मूठभर धान्याची व वाटीभर पाण्याची. उन्हाच्या प्रखर झळांमध्ये पक्ष्यांची जगण्यासाठीची ससेहोलपट थांबवण्यासाठी वन्य जीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे गरजेचे बनले आहे !

**– राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## टाकळीढोकेश्वर येथे एका दिवसांत १८ घरकुलांचे भूमिपूजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे आवास दिनानिमित्ताने गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या मार्गदर्शनाखाली एका दिवसांत १८ घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुल कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या भूमिपूजन प्रसंगी गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे, विस्तार अधिकारी बाळासाहेब मेहेत्रे, प्रशासक तथा सरपंच अरुणा खिलारी, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट, ग्रामपंचायत कर्मचारी लखन आल्हाट, बाळासाहेब जेजुरकर, शुभम कुटे व ग्रामरोजगार सेवक आदी उपस्थित होते.

या प्रसंगी गटविकास अधिकारी सोनकुसळे म्हणाले की, घरकुलासाठी एकूण दोन लाख रुपयांपेक्षा जास्त अनुदान असून त्यामध्ये एक केव्ही क्षमतेचे सोलर सुद्धा आहे. तसेच ज्या घरकुल लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही, त्यांच्यासाठी पंडित दीनदयाळ योजनेमार्फत जागा खरेदी केल्यानंतर एक लाख रुपये अनुदान शासनाच्या वतीने देण्यात येणारा आहे. टाकळी ढोकेश्वरमध्ये आतापर्यंत एकूण १४३ घरकुले मंजूर आहेत. त्यापैकी ६७ लाभार्थ्यांचे कामे सुरू असून काही कामे बाकी आहेत. ती पूर्ण करण्यासाठी गटविकास अधिकारी सोनकुसळे स्वतः हातात टिकाव घेऊन घरकुल लाभार्थ्यांच्या घरी जाऊन भूमिपूजन करत आहे. तरी सुरू नसलेल्या घरकुलांची कामे ३१ मार्च २०२६ पर्यंत सुरू करण्याबाबत सूचना दिल्या. ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या लाभार्थ्यांचे घरकुल सुरू होणार नाहीत त्या लाभार्थ्यांची घरकुले रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

टाकळी ढोकेश्वर येथिल मंजूर सर्व घरकुल ३१ मार्च पर्यंत सुरू करण्याबाबत ग्राम विकास अधिकारी बाळासाहेब दावभट यांना आदेश दिले आहेत. घरकुल लाभार्थ्यांनी लवकर कामे पूर्ण करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. मनिषा यादव, रामचंद्र मुरलीधर गंद्रे, सम्राट पवार, युवर पवार, राहुल सोन्याबापू आल्हाट, बाळू सोन्याबापू आल्हाट, गणेश बाळासाहेब पायमोडे, सिंधू नारायण साळवे, रावसाहेब भाऊ पायमोडे, संतोष सखाराम उंडे, धनश्री गुलाब बेलकर, रामदास भागा पाचपुते, रमाकांत निवडुंगे, मिलिंद भागवत,कुंडलिक धुमाळ, बन्सी धुमाळ, संतोष जाधव,ठकाजी पायमोडे या लाभार्थ्यांच्या घरकुलांचे भूमिपूजन करण्यात आले.

## नवीन बिना बौद्ध विहारात महान चक्रवर्ती सम्राट अशोकाची जयंती साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** भानेगाव येथीलभारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ, शाखा नवीन बिना यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात महान चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष रवींद्र ढोके यांच्याहस्ते तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राला माल्यार्पण व सामुहिक बुद्ध वंदना घेवून करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रम ाचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी सम्राट अशोक यांचा जन्म पुनर्वसु नक्षत्रात झाला होता व चैत्र शुक्ल अष्टमीच्या जयंती साजरी करण्याचे संदर्भ देताना अशोकाच्या जीवनाला तीन भागात विभागले असून धम्मशोक म्हणजेच दयेचा राजा याच त्याच्या धोरणामुळे तो अतुलनीय ठरला असून जगाला आज त्याच दया व शांतीची नितांत आवश्यकता आहे असे प्रतिपादित केले. यावेळी मिना नरेश ढोके यांनी गीताच्या माध्यमातून सम्राट अशोकाला अभिवादन केले. याप्रसंगी आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या अंजना मेश्राम, उके, प्रभा लोखंडे, सत्यभामा वासनिक, सत्यफुला कांबळे, रेखा लांजेवार, साजिता सहित गावातील नागरिक व बाल बालिका उपस्थित होते. संचालन सारिका तागडे तर आभार मिना मेश्राम यांनी मानले.

# टाकळीढोकेश्वर येथिल बनाईदेवी यात्रेची उत्साहात सांगता

## हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग; ढोल ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी

### मळगंगादेवीची पालखी छबिना मिरवणूक उत्साहात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेले ग्रामदैवत माता बनाईदेवी यात्रा उत्सव २१ मार्च ते २४ मार्च दरम्यान यात्रोत्सवच्या पार्श्वभूमीवर दसऱ्यानंतर चौथ्या दिवशी मळगंगादेवीची पारंपारिक पालखी व छबिना मिरवणूक सोमवारी रात्री टाकळी ढोकेश्वर गावातून वाजतगाजत, ढोल - ताशांच्या गजरात, डिजेच्या सुरावटीत आणि आकर्षक विद्युत रोषणाईत उत्साहात पार पडली. या सोहळ्यासाठी टाकळी गावासह पंचक्रोशीतील हजारो देवीभक्त उपस्थित होते.

टाकळी ढोकेश्वर येथिल बनाई देवी यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या हस्ते देवीची महापूजा करून पालखीला श्रीफळ अर्पण करण्यात आले. त्यानंतर पालखी व छबिना मिरवणूक मंदिराच्या दिशेने मार्गस्थ झाली. पालखी मार्गावर मळगंगा मातेच्या जयघोषांनी वातावरण दुमदुमले. अनेक महिलांनी नवस्फूर्तीची सेवा अर्पण केली. गावातून पालखी व छबिना मिरवणूक रात्री आठच्या सुमारास निघाली. यावेळी शोभेच्या फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. मळगंगा देवीच्या यात्रेसाठी टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील ग्राम स्थ तसेच परगावी असलेले गावकरी दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने उपस्थित होते. शनिवारी रात्री फकीर शहावाली बाबांचा संदल कार्यक्रमाने यात्रेची सुरुवात झाली. रविवारी रात्री बनाईदेवी यात्रेनिमित्त मंगला बनसोडे सह नितीनकुमार बनसोडे तमाशा कलावंतांनी आपल्या कलाकृतींनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सोमवारी दुपारी ४ वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा व रात्री ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित आला होता. मंगळवारी म ुक्ताई देवीची सकाळी काठी मिरवणूक काढण्यात आली.

दरम्यान दोन दिवस बैलगाड्यांच्या शर्यती तसेच रात्री नामवंत लावणी कलाकारांचा ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेनिमित्त गावात खाऊ,खेळणी साहित्य आणि विविध वस्तूंची दुकाने उभारली गेली होती. खरेदीसाठी ही ग्रामस्थांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

या बनाईदेवी यात्रा उत्सवाचे आयोजन टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ व बनाईदेवी यात्रा उत्सव कमेटीचे अध्यक्ष संपतराव तराळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या आयोजनात सहभागी उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), प्रशांत झावरे, अंकुश पायमोडे, मळिभाऊ रांधवण, विक्रम झावरे व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग घेतला.

---------------------------------------------------

यात्रेनिमित्त संपूर्ण टाकळी परिसर आनंदाच्या उत्साहाने न्हाऊन निघाला. श्रद्धा, परंपरा आणि भक्तीभव यांचे सुंदर संगम असलेला हा बनाईदेवी यात्रोत्सव यंदाही पंचक्रोशीतील ग्रामस्थांसाठी अविस्मरणीय ठरला.

## गरजेपेक्षा अधिक पेट्रोल व डिझेल खरेदी करू नका - जिल्हाधिकारी डॉ.इटनकर



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** अधिक सुरक्षितता आणि अनावश्यक काळजी या दोन गोष्टींना डोळ्यासमोर ठेवून ग्राहक भीतीपोटी आवश्यकतेपेक्षा जास्त पेट्रोल आणि डिझेल खरेदी करीत आहेत. एरव्ही ज्यांना जेवढी गरज आहे तेवढेच इंधन घेण्याचा ग्राहकाचा कल होता. तो गेल्या दोन ते तीन दिवसात विस्कळीत झाला आहे. पुरवठ्याचे गणित आणि त्याची असलेली पुरवठ्याची शृंखला विस्कळीत झाल्यामुळे पेट्रोलपंपांवर पेट्रोल संपल्याचे फलक लागत असल्याचे चित्र आहे. जनतेने अधिक पॅनिक न होता अथवा गरजेपेक्षा अधिक पेट्रोल व डिझेलची खरेदी न केल्यास पुरवठ्याची ही साखळी पूर्ववत येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पेट्रोल व डिझलेचा पुरवठा व त्याअनुषंगाने जिल्हा स्तरावर नेमण्यात आलेल्या समितीच्या वरिष्ठ पातळीवरील आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार दूरदृश्यप्रणालीद्वारे तर निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, जिल्हा पुरवठा अधिकारी आनंद पडोळे, अन्नधान्य वितरण अधिकारी विनोद काळे यांच्यासह इंधन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, पेट्रोल पंप डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

**पुरेसा साठा उपलब्ध**

सद्यस्थितीत संपूर्ण नागपूर जिल्ह्यात १ कोटी पाच लाख लिटर डिझेल उपलब्ध आहे. सुमारे ३५ लाख लिटर पेट्रोल उपलब्ध आहे. हे प्रमाण नागपूर जिल्ह्याच्या नित्य गरजेपेक्षा अधिक आहे. साधारणतः जिल्ह्यात वाहनधारक दोन चाकी वाहनात दररोज लोक ५० ते १०० रुपयांपर्यंत पेट्रोल भरत होते. ते आता ५०० ते ८०० रुपयांचे पेट्रोल भरत आहेत. चारचाकी वाहनांच्या बाबतीतही एरव्हीची खरेदी ३०० ते ६०० रुपये प्रति ग्राहक होती. ती आता २ ते ६ हजारांपर्यंत वाढली ही वस्तुस्थिती पेट्रोलपंप असोसिएशनने सादर केली. जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीची गरज पूर्ण होईल एवढा साठा व पेट्रोल व डिझलेची उपलब्धता असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांनी ही आपल्या रोजच्या गरजेपुरतेच पेट्रोल अथवा डिझेलची खरेदी करावी, असे आवाहनही पेट्रोलपंप डिलर्स असोसिएशनने केले.

**वाहना व्यतिरिक्त अन्य साधनांमध्ये पेट्रोल मिळणार नाही**

ग्रामीण भागातील काही पेट्रोलपंपांवर वाहनधारकांकडून वाहनांव्यतिरिक्त डब्बा, बॉटल अशा साधनांमध्ये इंधनाची मागणी करण्यात येत आहे. कुठल्याही पेट्रोलपंपधारकांनी वाहनाव्यतिरिक्त पेट्रोल देऊ नये. नियमानुसारही ते देता येत नसल्याचे जिल्हाधिका-यांनी स्पष्ट सांगितले.

**चुकीचे संदेश पसरविणा-यांविरुद्ध कठोर कारवाई**

समाजमाध्यमातून पेट्रोल व डिझेलच्या संदर्भात चुकीचे संदेश व अफवा पसरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अफवा पसरविणा-यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल. गरजेनुरूप पेट्रोलपंपांवर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले.


**कंपन्यांनी इंधनाचा अधिकाधिक पुरवठा करावा**

डिलर्स असोसिएशनने यावेळी कंपन्यांकडून मागणीप्रम ाणे अधिकाधिक पुरवठा करावा, अशी मागणी केली. पेट्रोलपंपधारकांच्या मागणीत वाढ झालेली आहे. त्यानुषंगाने पेट्रोल पुरवठा करणा-या कंपन्यांनीही अधिकचा पुरवठा करावा, त्या अनुषंगाने नियोजन करावे असे निर्देशही जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले.

## निफाड उपजिल्हा रुग्णालयात ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी "HPV' लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, निफाड (नाशिक) :** महिलांम ध्ये वाढणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य विभागाने मोठे पाऊल उचलले आहे. उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठीक्ष्झत (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेचा नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.




**कार्यक्रमाचे उद्घाटन आणि उपस्थिती**

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश शिंपी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी व डॉ. बाळू पाटील यांच्या आदेशानुसार आणि वैद्यकीय अधीक्षकडॉ. राजीव तांभाळेयांच्या म ार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. रुग्ण कल्याण समितीचे सदस्यमधुकर शेलारयांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलन करून मोहिमेची सुरुवात करण्यात आली.

**कर्करोग टाळण्यासाठी लस प्रभावी: डॉ. निलेश लाड**

स्त्रीरोग तज्ज्ञडॉ. निलेश लाडयांनी याप्रसंगी सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे, मात्र HPV लस यावर अत्यंत प्रभावी ठरते. ९ ते १४ वर्षे वयोगटात ही लस दिल्यास ती सर्वाधिक परिणामकारक असते. या वयोगटासाठी दोन डोस, तर १५ वर्षांवरील तरुणींसाठी तीन डोस दिले जातात.

**लसीबाबतचे गैरसमज दूर करा: डॉ. राजीव तांभाळे**

समाजात लसीबाबत असलेल्या अफवांवर भाष्य करताना डॉ. तांभाळे यांनी स्पष्ट केले की,

**वंध्यत्वाचा धोका नाही :**

या लसीमुळे वंध्यत्व येते हा पूर्णपणे चुकीचा समज आहे.

**लस सुरक्षित :**

ही लस जागतिक स्तरावर सुरक्षित आणि प्रभावी सिद्ध झाली आहे.

**विवाहापूर्वी लसीकरण योग्य :**

ही लस लग्नापूर्वी किंवा किशोरवयात घेणे अधिक फायदेशीर ठरते. HPV लस कर्करोगापासून सुरक्षा कवच प्रदान करते. पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे. डॉ. राजीव तांभाळे (वैद्यकीय अधीक्षक)

**नागरिकांना आवाहन**

रुग्ण कल्याण समिती सदस्यमधुकर शेलारयांनी तालुक्यातील नागरिकांना आवाहन केले की, मुलींच्या सुरक्षित भविष्यासाठी या मोहिमेचा लाभ घ्यावा. ज्या मुलींना लस घ्यायची आहे, त्यांनी आपल्या पालकांसह उपजिल्हा रुग्णालय येथेइन्चार्ज सिस्टर संजीवनी फणसे, सिस्टर जगताप किंवा मेट्रन दाभाडे मॅडमयांच्याशी संपर्क साधावा. लसीकरणानंतर ही भविष्यात महिलांनी नियमितपणे 'पॅप स्मिअर' चाचणी करणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांनी यावेळी आवर्जून सांगितले.

# दिवा येथे पाणी बिल घोटाळ्याचा आरोप

## मनसे शहर सचिव प्रशांत गावडे यांचा ठाणे महानगरपालिकेवर निशाणा



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिवा परिसरात वाढीव पाणी बिलांबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) चे शहर सचिव प्रशांत प्रभाकर गावडे यांनी पत्रकार परिषद घेऊन ठाणे महानगरपालिकाच्या पाणीपुरवठा विभागावर कथित घोटाळ्याचा आरोप केला आहे.

मनसेच्या मते, नागरिकांना अत्यंत जास्त आणि चुकीची पाणी बिलं दिली जात आहेत. जुने व त्रुटीपूर्ण मीटर रीडिंग वारंवार दाखवून सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक शोषण केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पक्षाने उदाहरण देत सांगितले की, एका नागरिकाचे १ लाख ९६ हजार रुपयांचे बिल सुधारणा करून ८७ हजार रुपयांपर्यंत कमी करण्यात आले, यामुळे बिलिंग प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मनसेने असा देखील आरोप केला आहे की, एकीकडे अर्थसंकल्पात कर वाढवला जाणार नाही असे सांगितले जाते, तर दुसरीकडे चुकीच्या बिलांच्या माध्यमातून नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकला जात आहे.

या प्रकारच्या अनियमितता सहन केल्या जाणार नाहीत, असा इशारा मनसेने दिला आहे. तसेच, नागरिकांची लूट थांबवली नाही तर दिवा पाणीपुरवठा विभागाविरोधात मनसे-शैलीतील आंदोलन छेडले जाईल आणि त्याची पूर्ण जबाबदारी ठाणे महानगरपालिका प्रशासनावर असेल, असेही सांगण्यात आले.

नागरिकांना आवाहन करताना मनसेने म्हटले आहे की, जर पाणी बिल असामान्यरित्या वाढलेले असेल, तर आपल्या मीटर रीडिंगची पडताळणी करावी आणि संबंधित विभागाकडे तक्रार नोंदवावी.

या प्रकरणामुळे स्थानिक पातळीवर नाराजी वाढत असून, आता सर्वांचे लक्ष ठाणे म हानगरपालिकेच्या भूमिकेकडे लागले आहे.

# चंद्रपुरात २८ व २९ मार्च ला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नागपूर विभागाचे विभागीय अधिवेशन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, नागपूर विभागाचे दोन दिवसीय विभागीय अधिवेशन येत्या २८ व २९ मार्च ला (शनिवार व रविवार) चंद्रपूर येथील राजीव गांधी इंजिनिअरिंग कॉलेज, बाबुपेठ, चंद्रपूर येथे आयोजित करण्यात करण्यात आले असून या अधिवेशनाची जय्यत तयारीला सुरुवात झाली आहे.

'शिक्षकहित, शिक्षणहित व राष्ट्रहित' हे ब्रीदवाक्य स्वीकारुन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद ही राज्यस्तरीय संघटना असून, गेल्या अनेक दशकांपासून कार्य करीत आहे. या अधिवेशनात शिक्षण क्षेत्रातील ज्वलंत समस्यांवर दोन दिवस विचारमंथन होणार आहे. शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्यांवर तोडगा काढणे, अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय मिळवून देणे, तसेच शिक्षणक्षेत्रातील विविध समस्या दुर करुन शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या नेहमी पाठीशी असणारी अशी ओळख असणारी एकमेव संघटना आहे.

या दोन दिवसीय विभागीय अधिवेशनाचे पहिल्या दिवशी म्हणजे २८ मार्च रोज शनिवार ला सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत नोंदणी, चहा नाश्ता होणार असून पहिले सत्र सायं. ६.३० ते ७.३० वा. टी. ई. टी., संचमान्यता, समायोजन व जुनी पेन्शन या विषयांवर मार्गदर्शक म्हणून राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार, तर अध्यक्ष म्हणून राज्य अध्यक्ष वेणुनाथ कडू राहणार आहे. दुसरे सत्र सायं. ७.३० ते ८.३० या वेळेत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर राज्य महिला आघाडी प्रमुख पुजाताई चौधरी मार्गदर्शन करणार आहे. तर तिसरे सत्र सायं. ८.३० ते ९.३० या वेळेत 'न्याय कसा आणि कुठे मागाल...' या विषयावर विभाग उपाध्यक्ष मधुकर मुप्पीडवार मार्गदर्शन करणार आहे. चौथे सत्र ९.३० ते १०.३० विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. तर १०.३० ते ११.३० वा. भोजन, विषय नियामक समितीची बैठक आयोजित केलेली आहे.

२९ मार्च २०२६ रोज रविवारला पहिल्या सत्रात सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत 'कार्यकर्त्याची जडणघडण' या विषयावर विनोद पांढरे विभाग उपाध्यक्ष हे मार्गदर्शन करणार असून, दुसऱ्या सत्रात सकाळी १०.३० ते ११.३० वा. 'पंच परिवर्तन' या विषयासाठी ज्येष्ठ विधीज्ञ तथा अध्यक्ष लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर हे अध्यक्ष राहणार असून मार्गदर्शक म्हणून शुभांगी मेंढे (संपर्क प्रमुख विश्व मांगल्य सभा) लाभणार आहे.

अधिवेशनाचा उद्घाटन सोहळा सकाळी ११.३० वा. राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी अजय वानखेडे, विभाग अध्यक्ष नागपूर हे राहणार आहे. स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. अशोकराव जिवतोडे, सचिव चांदा शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर तर प्रमुख अतिथी म्हणून माजी वित्त मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार, आ. किशोर जोरगेवार, माजी शिक्षक आमदार नागो गाणार, माजी आमदार सुधाकर कोहळे, वेणुनाथ कडू राज्य अध्यक्ष, पुजाताई चौधरी, राज्य महिला आघाडी प्रमुख, प्रमुख उपस्थितीत राजकुमार बोनकिले, राज्य सरकार्यवाह, योगेश बन, राज्य कार्याध्यक्ष, राजेश पातळे, शिक्षणाधिकारी माध्य. चंद्रपूर, अश्विनी केळकर, शिक्षणाधिकारी प्राथ. चंद्रपूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

या दोन दिवसीय विभागीय अधिवेशनात विविध विषयांवर चर्चा केली जाणार आहे. करीता समस्त शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठ्या संख्येनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक नागपूर विभाग,संयोजक तथा जिल्हाध्यक्ष ग्रामीण विलास खोंड, सहसंयोजक तथा जिल्हा कार्यवाह विठ्ठल राजुरकर, शहर अध्यक्ष विपीन मानकर, शहर कार्यवाह वसंत वडस्कर, विवेक आंबेकर, सरिता सोनकुसरे, यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिव पाणंद चळवळीला मोठे यश; शेतरस्ते अडवणाऱ्यांवर सरकारचा कठोर निर्णय

## खेर विधानभवन, आझाद मैदानावरील आंदोलनातील मागण्या मान्य – शरद पवळे

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२६, सुपा (अहिल्यानगर) :** राज्यातील शेतकरी आणि ग्रामीण भागातील वाहतुकीच्या प्रश्नावर महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मुंबई विधानभवनावर झालेल्या शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या लक्षवेध आंदोलनातील प्रमुख मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतरस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी सांगितले की, मागण्या मान्य होणे ही मोठे यश आहे; मात्र शासन निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी अधिक महत्त्वाची आहे.



त्यांनी पुढे स्पष्ट केले की, चळवळ शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करणार आहे.

राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना अंतर्गत सुधारित शासन निर्णय (ऋठ) जारी केला आहे. या निर्णयानुसार, गाव नकाशावर असलेल्या किंवा सार्वजनिक शेतरस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार आहे.

**कठोर नियमांची अंमलबजावणी**

शेतरस्ता अडवणाऱ्यांना ७ दिवसांची नोटीस

नोटीसनंतरही अतिक्रमण न काढल्यास प्रशासनाकडून थेट कारवाई

संबंधित व्यक्तीचे आधार कार्ड व ऋऑशअ‍ॅ खृ ५ वर्षांसाठी ब्लॉक

५ वर्षे सर्व शासकीय योजनांपासून वंचित

शेतकऱ्यांसाठी दिलासा

रस्त्यासाठी सक्तीचे भूसंपादन नाही

स्वेच्छेने दिलेल्या जमिनीवर स्टॅम्प ड्युटी व नोंदणी शुल्क माफ

जमीन शासनाच्या नावे नोंद होणार

ग्रामीण भागात शेतीमाल वाहतुकीसाठी बारमाही शेतरस्ते ही अत्यावश्यक गरज असल्याने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकरी वाद कमी होऊन शेती विकासाला चालना मिळेल यासाठी प्रत्यक्ष प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

# सम्राट अशोकांचा खरा इतिहास समाजापुढे मांडणे काळाची गरज - हरी मेश्राम

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२६, चिमूर (चंद्रपूर) :** सम्राट अशोकांचे मूळ पुरुष हे जन्माने बौद्ध होते त्यामुळे सम्राट अशोक हा जन्मत:च बौद्ध राजा होता, पण इथल्या इतिहासकारांनी खोटी माहिती सांगून कलिंग युद्धा नंतर सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला असं सांगण्यात आलं. परंतु तत्कालीन इतिहासकाराने सम्राट अशोकांना क्रूर राजकर्ता ठरवले.

मात्र इंग्रज संशोधकांनी सम्राट अशोक यांच्या शिलालेखांचा अभ्यास करून सम्राट अशोक असे समाजाभिमुख राजे होते, त्यांनी लोक कल्याणाच्या योजना कशा पद्धतीने आपल्या आणि आपल्या धर्माबरोबर सोबतच इतर धर्माचा आपण आदर केला पाहिजे अशी भावना सम्राट अशोक यांची होती. इंग्रज संशोधकांनी शिलालेखाच्या माध्यमातून समोर आणले असे प्रतिपादन आंबेडकरी विचारवंत हरी मेश्राम सर यांनी केले.महाबोधी महाविहार समन्वय समिती तालुका चिमूर व समता सैनिक दल तालुका चिमूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती येथे अखंड भारताचे निर्माता सम्राट अशोक जयंती कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाबोधी महाविहार समन्वय समिती चिमूर चे तालुकाध्यक्ष विलास राऊत प्रमुख अतिथी म्हणून आंबेडकरी विचारवंत हरी मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते डॉ.आशिष पाटील, डॉ.महेश खानेकर, आयु. सुरक्षाताई अंबादे धम्मांजली महिला मंडळ अध्यक्ष, तक्षशिला बुद्धविहाराचे अध्यक्ष वतन सहारे, धम्मपाल नरवडे एसबीआय चिमूर शाखा व्यवस्थापक आदी उपस्थित होते. चिमूर शहरांमध्ये दुसऱ्यांदा चक्रवती सम्राट अशोक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाबाई भीमरावजी आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाइन परीक्षेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.




प्रथम क्रमांक ₹१०००

*मार्शल निशा प्रकाशनाथ पाटील

*द्वितीय क्रमांक ₹७००

*मार्शल शाश्वत रूपचंद पाटील

*तृतीय क्रमांक ₹५००

*मार्शल द्रुष्टी विलास राऊत

*सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन प्रमाणपत्र वितरण(रोख रक्कम, प्रशस्तीपत्र, शिल्ड, भारत राष्ट्र कॅलेंडर) करण्यात आले.

हरी मेश्राम पुढे म्हणाले की, ज्या सम्राट अशोकांनी बंगाल पासून अफगाणिस्तान पर्यंत राज्य विस्तार केला त्याच सम्राट अशोकाला आज शासन विसरल्याचे दिसून येत आहे. सम्राट अशोकाच्या राज्यकारभाराच्या अनेक बाबीचा भारत देशाने स्वीकार केला .त्यांनी कोरलेले अशोक चक्र भारत देशांनी आपल्या ध्वजावर स्वीकारले . चार सिंहाची प्रतिमा सारनाथच्या स्तुपावर सरकारने स्वीकारले.

एवढे सारे असताना आज मात्र सम्राट अशोकांना देश विसरला त्यांचे कर्तृत्व देश विसरून गेला, याबाबत त्यांनी खेद व्यक्त केला.याप्रसंगी विलास राऊत, डॉ. आशिष पाटील, डॉ. महेश खानेकर, आयुष्यमती सुरक्षा अंबादे, धम्मपाल नरवडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे संचालन प्रकाश मेश्राम यांनी केले प्रास्ताविक महेंद्र बारसागडे यांनी केले तर

आभार प्रियानंद गेडाम यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धम्मांजली महिला मंडळ,महाबोधी महाविहार समन्वय समिती तालुका चिमूर, समता सैनिक दल चिमूर यांनी सहकार्य केले.

# किचनचे बजेट कोलमडणार! खाद्यतेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे अन्न प्रक्रिया कंपन्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यांचा उत्पादन खर्च वाढला आहे. सध्या कच्च्या तेलाच्या किमती कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. काही काळासाठी, ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलरच्या खाली घसरल्या होत्या. त्यानंतर, त्या १०० डॉलरच्या वर गेल्या.

अन्न प्रक्रिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, आतापर्यंत ते वाढलेला खर्च स्वतःच सहन करत आले आहेत, परंतु जर मध्य पूर्वेतील संकट दीर्घकाळ टिकले, तर त्यांना उत्पादनांच्या किमती वाढवण्यास भाग पडेल. कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीमुळे मालवाहतुकीचा खर्चही वाढला आहे.एडब्ल्यूएल अ‍ॅग्री बिझनेसचे सीईओ



श्रीकांत कान्हेरे म्हणाले की, पश्चिम आशियातील संकटामुळे वस्तूंच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. पॅकेजिंग साहित्याच्या किमतीत २०-२५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पुरवठा साखळीतील संभाव्य व्यत्ययांमुळे खाद्यतेल सीएनएफच्या किमतीही वाढल्या आहेत. सध्या फारसा परिणाम झालेला नाही. जर हे संकट एका महिन्यापेक्षा जास्त काळ टिकले, तर खाद्यतेलाच्या किरकोळ किमती वाढू शकतात.

मार्चमध्ये भारतीय कच्च्या तेलाची बास्केट प्रति बॅरल १२३.१५ डॉलर होती. ही फेब्रुवारीमधील ६९.०१ डॉलरच्या पातळीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. पार्लेचे मयंक शाह म्हणाले की, कंपनी वाढलेल्या खर्चाचा काही भार ग्राहकांवर टाकण्याचा निर्णय घेऊ शकते. ते म्हणाले की, कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीमुळे उत्पादन, पॅकेजिंग आणि लॉजिस्टिक्स खर्चावर परिणाम झाला आहे. सिंपली फ्रेश आणि न्यूट्रिक ब्रँड्सची मालक असलेल्या बीएन ग्रुपने म्हटले आहे की, आम्ही आमच्या कामकाजावर परिणाम करणारा आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. नफ्याचे प्रमाण वाढवण्याऐवजी ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यावर आमचे लक्ष आहे.

# थोडक्यात

## शासनाच्या योजना कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचवावे - आ.दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कान्हुरपठार येथे महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आज उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडले. या शिबिरात पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देत प्रशासनाला अधिक लोकाभिमुख होण्याचे आवाहन केले. यावेळी आमदार दाते म्हणाले, शासनाच्या योजना व सेवा या कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गाव पातळीवर अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी जागेवरच सोडवणे, हेच प्रशासनाचे खरे यश आहे. महसूल, कृषी, परिवहन, आरोग्य, शिक्षण, सहकार अशा विविध विभागांनी एकत्र येऊन जनतेला दिलासा देण्याचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे.

शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. शासन जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असून प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी समन्वयाने काम केले पाहिजे. शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी जागेवरच सुटल्या पाहिजेत. अशा शिबिरांमुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळत असून शासनाच्या ह्या उपक्रमाची फलश्रुती सर्वसामान्य नागरिकांच्या समाधानात शोधल्यास निश्चित सापडत असून एक जनतेचा प्रतिनिधी म्हणुन ह्या गोष्टीचा मला मनस्वी आनंद आहे. या शिबिरात भाजपचे कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाने, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, स्वप्नील ठुबे, अर्जुन नवले, संतोष ठुबे, बाबा चेडे, रमेश गाडगे यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मोहफुले वेचायला गेलेल्या ८१ वर्षीय वृध्दाचा वाघाच्या हल्लयात मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील मरेगाव नियत क्षेत्रात वाघाच्या हल्लयात गावकरी ठार झाल्याची घटना २५ मार्चला सायंकाळी घडली. दरम्यान मागील सुमारे पावणे तीन महिन्यात अकरा जणांचा मृत्यू वन्यजीव हल्लयात झाला आहे. सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील मरेगाव बीटातील कक्ष क्रमांक १३७५ मध्ये बळीराम पेंदाम (वय ८१) हे गावालगत जंगलात मोहफुले गोळा करण्यासाठी गेले होते. त्यावेळी अचानक वाघाने हल्ला करुन त्यांना ठार केले. याबाबतची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते.

घटनास्थळी तणावाची स्थिती बघता वनविभागाने पोलिस विभागाला पाचारण केले होते. वाघावर नजर ठेवण्यासाठी परिसरात वनविभागाने कॅमेरा ट्रॅप लावले आहेत. घटनेचा पंचनामा करीत मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी सिंदेवाही ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. मृतकाच्या कुटुंबाला वनविभागाकडून आर्थिक मदत म्हणून २५ हजार रुपये देण्यात आले. २५ मार्चला एकाच दिवशी वाघाने दोघांची शिकार केल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. तेंदूपत्ता हंगाम येत असल्याने मानव- वन्यजीव संघर्षाच्या घटनेत वाढ होण्याची चिन्हे आहे.


## मंद्रूपच्या जिल्हा परिषद शाळेत 'बाल आनंद मेळावा' उत्साहात



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२६, सोलापूर :** मंद्रूप जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (भीम नगर) मंद्रूप येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना व्यावहारिक जगाची ओळख करून देण्यासाठी 'बाल आनंद मेळाव्याचे' अत्यंत उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्वतःचे विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडून विक्रीचा आनंद लुटला. बाजारातील उलाढाल कशी चालते, वस्तूंची खरेदी-विक्री आणि पैशांचे हिशोब कसे हाताळावे, या उद्देशाने शाळेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या स्टॉलवर घरगुती बनवलेले विविध चविष्ट खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले होते. या माध्यमातून मुलांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडण्यास मदत झाली. या मेळाव्याला पालक आणि ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या कौशल्याने ग्राहकांशी संवाद साधत आपल्या पदार्थांची विक्री केली. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक कांतीलाल गुमतापुरे, शिक्षक विजय बबलेश्वर, वंदना म्हेत्रे, वर्षा पवार, मेघरानी राजमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत शिंगडगाव, उपाध्यक्ष रुपाली कोळी, यांच्यासह राजकुमार राजपूत, विश्वनाथ जेऊरकर, किरण कुंभार, चंद्रकांत कुंभार, विजयालक्ष्मी काळे, इंदुमती कांबळे, अंबिका काळे, भारती व्हनकोरे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

## महापे मिलेनियम बिझनेस पार्कच्या बस थांबाजवळ अतिक्रमण; नागरिकांना अडचण



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, महापे (नवी मुंबई) :** नवी मुंबईच्या महापे मिलेनियम बिजनेस पार्कच्या बस थांबाजवळ काही समाजकर्त्यांनी अतिक्रमण केलेले आहे. पान टपरी, कॅन्टीन चायनीज, उसाची मशीन अशा अनेक व्यवसाय करणाऱ्यांनी अतिक्रमण केलेले आहे. त्याच्याच पाठीमागे सार्वजनिक शौचालय सुद्धा आहे, ज्यामुळे स्वच्छालय साठी जाण्यासाठी नागरिकांना अडचण होत आहे. समाजसेवक विनोद वास्कर यांनी नवी मुंबई आयुक्तांकडे मागणी केली आहे की, अतिक्रमण केलेल्या व्यवसायांवर नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे कारवाई करण्यात यावी.